# आदर्श विद्यार्थी

'विद्यार्थी' असं म्हणाले कि युनिफॉर्म घालून पाठीवर बॅग घेऊन शाळेत कॉलेज मध्ये जाणारी आकृती डोळ्यासमोर येते विद्यार्थीपण ही खरा तर शाळा कॉलेजपुरती मर्यादित नाही ही आयुष्यभर चालणारी दशा आहे.

चालू लेखात शाळा कॉलेज मध्ये जाणारी 'विद्यार्थी ' हीच संकल्पना गृहीत धरलेली आहे शाळेमध्ये ' आदर्श विद्यार्थी ' 'BEST STUDENT ' म्हणून एखादा मुलगा / मुलगी ओळखला जातो ' आदर्श विद्यार्थी ' ही ओळख त्या विद्यार्थ्यांच्या काही विशेष गुणांमुळे झालेली असते. चला तर मग जाणून घेऊयात आदर्श विद्यार्थ्यांचे खास गुण आपल्या मध्ये देखील गुणांचा विकास व्हावा यासाठी प्रयत्न करूयात .

* स्वयंशिस्त :- स्वतःने स्वतःसाठी घालून घेतलेले आणि पाळलेले नियम. उदा . खेळायला जाण्यापूर्वी मी माझा अभ्यास पूर्ण करेन हा नियम विद्यार्थ्याने घालून घेतला तर तो स्वतःहून पाळणार

* आदरभाव :- शिक्षक , वडीलधाऱ्या व्यक्तींसाठी , मित्र आदर्श विद्यार्थ्यांच्या मनात आदरयुक्त भाव असतात वर्तनातून हे प्रकर्षाने दिसून येतात.

* सातत्य :- वागण्या बोलण्यामध्ये मेळ असतो आणि विषयाचा आभ्यासात सातत्य असते. ठरवलेली गोष्ट साध्य होईतोपर्यंत प्रयत्नात सातत्य , मधेच सोडून न देणे हा महत्वाचा गुण आदर्श विद्यार्थ्यांमध्ये असतो .

* नागरिकत्व :- ज्या शाळा कॉलेजमध्ये आहेत त्या शाळा कॉलेजच्या नियमांचे पालन आदर्श विद्यार्थी करतोच.

* परस्पर - संबंध :- मित्र मैत्रिणींशी मैत्रीपूर्ण संबंध इतरांना मदत करण्याची वृत्ती असते. आपल्या बोलण्यातून, कृतीतून तो इतरांना साहाय्य करण्यास कायम तयार असतो.

* जबाबदारी :- आदर्श विद्यार्थी स्वतःच्या साहित्याची ( शालेय / इलेक्ट्रॉनिक्स ) नीट काळजी घेतो. स्वतःची , स्वतःचा वेळेची जबाबदारी त्याने स्वतः घेतलेली असते . आई वडिलांना, शिक्षकांना त्याच्या मागे लागावे लागत नाही.

* विश्वासू :- आदर्श विद्यार्थ्यांवर एखादी शालेय कानाची जबाबदारी ( PROJECT ) दिल्यास तो पूर्ण करणारच ही विश्वास शिक्षकांना त्याच्या पालकांना असतो.

* प्रामाणिकपणा :- कोणाची एखादी वस्तू काही कारणास्तव घेतली तर वेळेत परत करतील चुकून कोणाची पेन्सिल जरी बॅगमध्ये आली तर दुसऱ्या दिवशी आठवणीने देतील.

आदर्श विद्यार्थी हा आपली कर्तव्य पार पडणारा उत्साही अभ्यासाबरोबरच इतर सांस्कृतिक कार्यक्रमात भाग घेणारा स्वतःचे उदांत ध्येयाप्रत काम करणारा आणि सर्वात महत्वाचा नवीन गोष्ट शिकण्याची तयारी असणारा असतो .